**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १/२०२३ मधील नि.क्र.२२ वरील आदेश</u>**
**<u>सुझलॉन गुजरात विंड पार्क लि. तर्फे वि. जिल्हाधिकारीसोा वगैरे</u>**

**CNR No.MHSN020033972022**

१. प्रतिवादी क्रमांक १ यांनी, त्यांच्या विरुध्द 'एकतर्फा' असा जो आदेश झालेला आहे, तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करुन घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी मुळ दावा ठरावाकरीता व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे शासकीय कामकाजामुळे व वेळेत माहिती न मिळाल्याने त्यांना केसकामी हजर होता येऊ शकलेले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. तसेच त्या कारणास्तव त्यांना केसकामी कैफियत देता येऊ शकलेली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द जो 'एकतर्फा' असा आदेश झालेला आहे तो आदेश रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जास अनुषंगून वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक २५ कडे दाखल केलेले आहे. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

४. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये शासकीय कामकाजामुळे व वेळेत माहिती न मिळाल्यामुळे केसकामी हजर होता येऊ शकलेले नाही. त्यामुळे त्यांना कैफियत देता येऊ शकलेली नाही, असे शपथपूर्वक कथन केलेले आहे. अशा परिस्थीतीत दाव्याचे स्वरुप पाहता, तसेच दावा गुणदोषावर चालण्याच्या दृष्टीने व प्रतिवादी क्रमांक १ हे महाराष्ट्र शासन असल्यामुळे त्यांना त्यांचा बचाव घेण्याची संधी

देणे आवश्यक ठरते. त्यामुळे जरी प्रतिवादी क्रमांक १ यांना केसकामी हजर होण्यास व कैफियत दाखल करण्यास उशीर झालेला असला तरी, भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्याच्या दृष्टीने प्रतिवादी क्रमांक १ यांच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द करून त्यांची कैफियत कोर्टात दाखल करण्यास मुभा देणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्रमांक १ यांचा नि.२२ कडील त्यांच्याविरुध्द झालेला दावा 'एकतर्फा' आदेश, रद्द करुन त्यांची कैफियत रेकॉर्डवर घेणेसंबंधी मागणीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबाबत आदेश नाही.

३. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

sd/xxx

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक – ०५/०२/२०२४** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०५/०२/२०२४ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | ०५/०२/२०२४ |